पुणे, मुंबई, नागपूर, अहमदनगर, औरंगाबाद आणि दिल्ली येथून प्रसिद्ध

# लोकसत्ता

पुणे, गुरुवार, ६ मे २०२१ लोकमान्य, लोकशक्ती !

## कर्मवीर पुण्यतिथी कार्यक्रम रद्द

**लोकसत्ता वार्ताहर**

**वाई :** रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६२ व्या पुण्यतिथीचा कार्यक्रम दरवर्षी दि.९ मे रोजी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्या उपस्थितीत साजरा केला जातो. कोविड-१९ मुळे निर्माण झालेली गंभीर परिस्थिती लक्षात घेता या वर्षी रविवार, दि. ९ मे रोजी होणारा कर्मवीर पुण्यतिथी नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आला असल्याची माहिती सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी दिली.

रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी निवेदनाद्वारे, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या ६२ व्या पुण्यतिथी कार्यक्रमाच्या निमित्ताने ७ व ८ मे रोजी संस्थेच्या वतीने यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा येथे माध्यमिक विभागाकडील शाखाप्रमुख आणि धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालया कडील प्राचार्यांसाठी शैक्षणिक व्याख्यान सत्रांचे आयोजन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमही रद्द करण्यात आले असल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले आहे.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.